**नि.फौ.के. नं. ११५/२०२५**
**महाराष्ट्र शासन वि. शंकर**
**निशाण क्र. ०९**

**(प्रस्तुत प्रकरणातील आरोपी हा न्यायालयीन कोठडीमध्ये आहे. सदर आरोपीस रत्नागिरी मध्यवर्ती कारागृह यांचेकडुन व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर करण्यात आले. सदर व्हीडीओ कॉलची आवाज प्रेक्षपणाचा दर्जा तपासुन पाहण्यात आला असुन तो चांगला आहे. सदर आरोपी व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर असताना त्याचेसमक्ष साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात येत आहे.**

**सबब, सदर साक्षीदाराची साक्ष खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.)**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ यांचा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – राजेश तुकाराम आंबवकर,
**वय –** ४६ वर्षे, **व्यवसाय** – दुकान व्यवसाय,
**राहणार –** संगमेश्वर, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. एल. दड्डेकर यांचेकडून –**

**०१**. मी चिपळुन येथे राहण्यास असुन माझे मोबाईलचे दुकान संगमेश्वर, ता. संगमेश्वर येथे आहे. मी रोज माझ्या दुकानात चिपळुन येथुन येवुन जावुन करतो. दिनांक ०८/१०/२०२५ रोजी रात्री ०७:३० ते ०८:३० च्या दरम्यान मी माझे मोबाईलचे दुकान बंद करुन चिपळुन येथे गेलो होतो. दिनांक ०९/१०/२०२५ रोजी मला माझा भाऊ – रामदास तुकाराम आंबवकर याचा फोन सकाळी ०७:३० च्या दरम्यान आला. त्याने मला फोनवरुन माझ्या दुकानाचे शटर अर्धे उघडले असल्याचे सांगितले. त्यामुळे मी घाबरलो. त्यानंतर मी माझा मुलगा – आर्य याला घेवुन संगमेश्वर येथे आलो. माझ्या

दुकानाचे शटर अर्धवट उघडलेले होते व दुकानाच्या दरवाजाला लावलेले चारही कुलुप तोडुन बाजुला टाकले होते. माझ्या दुकानातील पॉवरबँकचा बॉक्स, वॉच, हेडफोन यांचे बॉक्स तेथे पडलेले असल्याचे मला दिसले. शटरच्या बाहेर एक सळी व एक पाना पडलेला असल्याचे मला दिसले. त्यानंतर मी पोलीस ठाण्यामध्ये फोन करुन सदर बाब कळविली.

**०२.** त्यानंतर पोलीस व फॉरेन्सीकची मोबाईल व्हॅन, सोबत श्वान पथक व हातांचे ठसे घेणारे पथक आले होते. तेथे दिवसभर पोलीसांनी तपासणी केली. सायंकाळच्या सुमारास पोलीसांनी पंचांसमक्ष तेथे पंचनामा केला. माझ्या दुकानातुन वाय–३१ प्रो विवो कंपनीचा मोबाईल, एफ–१७ सॅमसंग कंपनीचा मोबाईल, ओपो–के–१३ एक्स कंपनीचा मोबाईल, एक जीओ कंपनीचा रॉऊटर, एक पॉवरबँक, एक हेडफोन व एक घडयाळ इत्यादी वस्तु चोरीला गेल्याचे दिसुन आले.

**०३.** सदर घटनेची मी पोलीस ठाण्यात तक्रार दिली. *(साक्षीदाराला तक्रार दाखविण्यात आली). ती तीच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे. (सदर दस्ताला* ***निशाणी क्रमांक १०*** *देण्यात येते).*

**०४.** सायंकाळी ०६:०० ते ०६:१५ च्या सुमारास पंचनाम्यावेळी मी, पोलीस, पंच – आकाश शेटये व राजेंद्र बिर्जे असे आम्ही हजर होतो. त्यावेळी मी पोलीस व पंचांना घडलेली घटना सांगितली. माझ्या दुकानातील दोन ते तीन मोबाईल फोडलेले होते. परंतु, त्याची चोरी झालेली नव्हती. पोलीसांनी तशी तेथील पाहणी करुन लिखान केले. पोलीसांनी त्यावेळी ०४ कुलुपे, एक सळी व एक पाना इत्यादी ताब्यात घेतले. तो मुद्देमाल दाखविल्यास मी ओळखु शकतो. *(साक्षीदाराला प्रकरणातील मुद्देमाल एक लोखंडी सळी दाखविण्यात आली). ती तीच जप्त केलेली लोखंडी सळी आहे. सदर लोखंडी सळीला एका बाजुस दोन लोखंडी वेल्डींग करुन जोडलेले आहे. (सदर*

***<u>लोखंडी सळीस वस्तु – अ</u>*** *देण्यात येते). (साक्षीदाराला प्रकरणातील उर्वरीत मुद्देमाल दाखविण्यात आला). त्यामध्ये एका प्लॅस्टीकीच्या पिशवीमध्ये ०३ कुलुपे आहेत. दुसऱ्या प्लॅस्टीक पिशवीमध्ये एक कुलुप आहे. तिसऱ्या प्लॅस्टीक पिशवीमध्ये एक पाना आहे. ते तेच जप्त केलेले ०४ कुलुपे व एक पाना आहे. (**<u>०४ कुलुपे यांना एकत्रीतपणे वस्तु – 'ब' व पाना यास वस्तु – 'क'</u>** देण्यात येते). (साक्षीदाराला प्रकरणातील उर्वरीत मुद्देमाल दाखविण्यात आला). तो तोच विवो कंपनीचा मोबाईल व घडयाळ आहे. (**<u>विवो कंपनीचा मोबाईल यास वस्तु – 'ड' व घडयाळ यास वस्तु – 'इ'</u>** देण्यात येते).*

**०५**. *(साक्षीदाराला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे. (**<u>घटनास्थळ पंचनाम्याला निशाणी क्रमांक ११</u>** देण्यात येते).* त्यानंतर पुन्हा पोलीसांनी मला दिनांक १३/११/२०२५ रोजी बोलावले होते. त्यादिवशी पोलीसांनी मला आरोपी व मिळालेला मुद्देमाल दाखविला. उर्वरीत चोरीला गेलेला मुद्देमाल शोध घेवुन दाखवितो, असे पोलीस मला म्हणाले. तसे पोलीसांनी लिखान करुन त्यावर माझी सही घेतली. *(साक्षीदाराला दिनांक १३/११/२०२५ रोजीचा पुरवणी जबाब दाखविण्यात आला). तो तोच असुन त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे. (सदर दस्ताला **<u>निशाणी क्रमांक १२</u>** देण्यात येते).* आरोपीने चोरी केल्याचे त्यावेळी कबुल केले होते. त्यावेळी आरोपीकडुन माझा चोरीला गेलेला मोबाईल मिळाला होता.

**०६**. आरोपीला दाखविल्यास मी ओळखु शकतो. आज रोजी व्ही.सी.वरुन दिसत असलेला आरोपी हा तोच आहे.

**सरतपास पूर्ण**.

**<u>उलटतपास – आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. आर. एस. जोशी यांच्याकडून</u>** –

**०७**. माझे इयत्ता १० वी पर्यंत शिक्षण झालेले आहे. मागील सोळा वर्षांपासुन

मी चिपळुन येथे राहण्यास आहे. चिपळुन ते संगमेश्वर हे अंतर ४५ किलोमीटर इतके आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे अंतर खाजगी वाहनाने कापण्यास अंदाजे सव्वा तास लागतो. त्यादिवशी सायंकाळी ०४:०० ते ०५:०० च्या सुमारास तथाकथीत घटनेची मी तक्रार नोंदविली होती. सदरची तक्रार मी लेखी स्वरुपात दिली होती. तक्रार दिल्याची मी सांगितलेली सायंकाळी ०४:०० ते ०५:०० ची सुमाराची वेळ माझ्या तक्रारीमध्ये नमुद नसल्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या भावाचा सकाळी ०७:३० वाजता फोन आल्याची वेळ माझ्या तक्रारीमध्ये नमुद नसल्याचे कारण मला सांगता येत नाही.

०८. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दुकानाचे 'दत्तकृपा मोबाईल शॉपी' असे फिर्यादमध्ये नाव नमुद नाही. माझ्याकडे सदर दुकान चालविण्याचा परवाना आहे. सदरचे दुकान माझ्या मालकीचे असलेबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा मी तपासीक अधिकारी यांना दिला नव्हता. माझ्या दुकानातील तथाकथीत चोरीला गेलेला मुद्देमाल माझ्या दुकानात होता, असे दाखविणारा कोणताही कागदोपत्री पुरावा मी तपासीक अधिकारी यांना दिला नाही. हे म्हणणे खरे आहे की, तशी मागणी पोलीसांनी देखील माझ्याकडे केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, तसा कागदोपत्री पुरावा पोलीसांना देण्यास मला कोणतीही अडचण नव्हती.

०९. हे म्हणणे खरे आहे की, मोबाईलला आयएमईआय क्रमांक एकच असतो. साक्षीदार पुन्हा सांगतो की, मोबाईलला दोन आयएमईआय क्रमांक असतात. परंतु, मोबाईलची विक्री केल्यास आम्ही त्याच्या पावतीवर केवळ एकच आयएमईआय क्रमांक नमुद करतो. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीमध्ये मोबाईलचे दोन आयएमईआय क्रमांक नमुद केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही क्रमांक नमुद करण्यास मला कोणतीही अडचण नव्हती.

**१०.** मी पोलीसांना माझ्या दुकानातील स्टॉक रजिस्टरची प्रत दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी देखील माझ्याकडे तशी मागणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, 'दत्त कृपा मोबाईल शॉपीची' ग्रामपंचातीकडील कर पावती माझ्या नावे नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर कर पावती मी पोलीसांकडे जमा केली नाही व पोलीसांनी देखील माझ्याकडे मागितली नाही.

**११.** हे म्हणणे खरे नाही की, पंच – आकाश शेटये व राजेंद्र बिर्जे हे माझे जवळचे मित्र/नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे कुलूपांवरील, सळी व पाना यांवरील ठसे घेण्याकरीता फॉरेन्सीक पथकाने पंचनामा करुन ते सर्व जप्त केली नाहीत.

**१२.** हे म्हणणे खरे नाही की, निशाणी क्र. १२ कडील माझ्या पुरवणी जबाबामधील मजकुर मी खोटा नमुद केला आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी मला दाखविलेले सी.सी.टी.व्ही. फुटेज माझ्यासमक्ष जप्त केले नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, साईराज कोल्ड्रींक्स या दुकानाच्या मालकाने पोलीस ठाण्यात तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, साईराज कोल्ड्रींक्स या दुकानाबाहेर ''आपण सी.सी.टी.व्ही.च्या नजरेखाली आहात'', असे फलक लिहिलेले नाहीत.

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, वस्तु – अ ते इ कडील मुद्देमालावर माझी सही घेण्यात आलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ पंचनामा हा हाताने लिहिण्यात आला होता, तो टंकलिखीत केला नव्हता. साक्षीदार पुन्हा सांगतो की, पोलीसांनी लॅपटॉप आणला होता. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी लॅपटॉप आणल्याचे मी खोटे कथन करीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी तशी तेथील पाहणी करुन लिखान केले, हे मी खोटे कथन करीत आहे. सदरचा पंचनामा सायंकाळी ०६:१५ वाजता सुरु करुन सायंकाळी ०७:०० ते ०७:१५ च्या दरम्यान पुर्ण करण्यात

आला होता. हे म्हणणे खरे नाही की, सदर वेळेच्या दरम्यान पंचनामा करण्यात आल्याचे मी खोटे कथन करीत आहे.

**१४**. त्यादिवशी दुपारी ०४:०० ते ०४:१५ च्या दरम्यान मी तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, तशी तक्रार पोलीसांनी प्रकरणात दाखल केली नाही. मी माझी फिर्याद पाहुन सांगतो की, त्यावर दुपारी ०४:०० ते ०४:१५ अशी वेळ नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने माझ्या दुकानातील माझ्या मालकीचा कोणताही मुद्देमाल चोरी केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांच्या सांगण्यावरुन त्यांना मदत करण्यासाठी खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील सर्व मजकुर मी खोटा कथन केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**
न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख,
जि. रत्नागिरी.

दिनांक ०३/०२/२०२६
स्थळः देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date of decision | :- | 03/02/2026 |
| Evidence signed by PO. on | :- | 03/02/2026 |
| Evidence uploaded on | :- | 03/02/2026 |